माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज.

तक्रार क्र.रामाआ-११९/२०२०/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| रामानंद गोविंद शेवाळे | ग्रामसेवक ,<br>ग्रामपंचायत मंचर,<br>ता. आंबेगाव, जि. पुणे | विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय<br>आंबेगाव, पो. घोडेगाव,ता. आंबेगाव, जि. पुणे |

<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक-०४-१०-२०२४</u>

त्यांनी आयोगाकडे दि.१०/१२/२०२० रोजी तक्रार अर्ज केला होता, त्यामध्ये द्वितीय अपिल क्र.३३२३/२०१७ मध्ये दि.२४/८/२०२० रोजी पारीत आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी केली नाही, अशी तक्रार केली आहे.

तक्रारदार सुनावणीस गैरहजर होते, यापूर्वी दि.२०/११/२०२३ रोजीच्या सुनावणीस देखील ते कोणतीही सूचना न देता गैरहजर आहेत.

आयोगाने द्वितीय अपिल क्र.३३२३/२०१७ दि.२४/८/२०२३ रोजी पारीत आदेश जन माहिती अधिकारी ग्रामसेवक यांना १५ दिवसात नि:शुलक् माहिती देण्याबाबत आदेश दिले होते.

सुनावणीचेवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुभाष थोरात यांनी सुचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सचिन तुकाराम उंडे हे होते, ते सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत वारुळवाडी ता. जुन्नर जिल्हा पुणे येथे कार्यरत आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आयोग आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही अभिलेख उपलब्ध नाहीत.

यावरुन स्पष्ट होते की, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सचिन तुकाराम उंडे यांनी आयोग आदेशाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे आयोग आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची कारवाई का

करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

२. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय आंबेगाव, पो. घोडेगाव, ता.आंबेगाव, जि. पुणे यांनी सदर आदेशाची प्रत संबंधित जन माहिती अधिका-यास बजावून पोच आयोगास सादर करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5907/2024 दिनांक -15/10/2024

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.